# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

दूरध्वनी क्रमांक. :
०२०–२५६०१२२३
०२०–२५६०१३५३
०२०–२५६०१२६३

गणेशखिंड, पुणे ४११००७
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
naac@unipune.ac.in
iqac@unipune.ac.in

संदर्भ क्र.:– अंगुसिक/अभाउशिसका/ 77

दिनांक – २४/०१/२०१९

प्रति,
मा. प्राचार्य/मा. संचालक,
सर्व संलंग्नित महाविद्यालये व मान्यताप्राप्त परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे ४११००७.

विषय – **अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) च्या सन २०१७–१८ च्या मानधनाबाबत व सन २०१८–१९ मध्ये नवीन महाविद्यालयांची/परिसंस्थेची नोंदणी करणेबाबत.**

संदर्भ – मा. संचालक, शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण), महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे ४११००१ यांचे दि. २४ जानेवारी, २०१९ रोजीचा ईमेल.

महोदय/महोदया,

वरील संदर्भीय विषयास अनुसरून कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी शैक्षणिक वर्ष **सन २०१७–१८** ची अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) च्या वेबपोर्टलवर माहिती पूर्ण भरून अपलोड केलेली आहे, अशा सर्व महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी मानधनाबाबत (Remuneration) **गुरूवार, दि. २८ फेब्रुवारी, २०१९ पर्यंत** ऑनलाईन अर्ज करावयाचे आहेत, तसेच याची सर्व महाविद्यालये व परिसंस्थांच्या नोडल अधिका–यांनी नोंद घ्यावयाची आहे. जी महाविद्यालये व परिसंस्था विहीत मुदतीत मानधनाबाबत (Remuneration) अर्ज करणार नाहीत, त्यांची नंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद संबंधित महाविद्यालयांचे व परिसंस्थांचे मा. प्राचार्य/मा. संचालक व नोडल अधिका–यांनी घ्यावयाची आहे.

तसेच **सन २०१८–१९** मध्ये ज्या महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी अद्यापपर्यंत अखिल भारतीय उच्चतर शिक्षा सर्वेक्षण कार्यक्रम (A.I.S.H.E.) च्या वेबपोर्टलवर नोंदणी केली नाही, अशा सर्व संबंधित महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी **गुरूवार, दि. ३१ जानेवारी, २०१९** पर्यंत नोंदणी पूर्ण करावयाची आहे, याची नोंद संबंधित महाविद्यालयांचे व परिसंस्थांचे मा. प्राचार्य/मा. संचालक व नोडल अधिका–यांनी घ्यावयाची आहे. नंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**ज्या महाविद्यालयांच्या व संस्थेच्या नावांत व पत्त्यांमध्ये बदल झालेले आहेत, अशा सर्व संबंधित महाविद्यालयांनी व परिसंस्थांनी त्यांच्या लेटरहेडवर मा. प्राचार्य/मा. संचालक यांच्या सहीसह अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे गुरूवार, दि. ३१ जानेवारी, २०१९ पर्यंत अर्ज जमा करावे, याची नोंद संबंधित महाविद्यालयांचे व परिसंस्थांचे मा. प्राचार्य/मा. संचालक व नोडल अधिका–यांनी घ्यावयाची आहे. नंतर कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.**

या संदर्भात काही अडचणी उद्‌भवल्यास अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे दूरध्वनी क्र. ०२०–२५६०१२२३, २५६०१३५३ यावर संपर्क साधावा.

आपला,

24/1/19

(मुं. वि. रासवे)
उपकुलसचिव,
अंतर्गत गुणवत्ता सिध्दता कक्ष
(अतिरिक्त कार्यभार)